कर्दळीवन सेवा संघ, पुणे आयोजित

गिरनार गुरुशिखर यात्रा

गरुडेश्वर - नारेश्वर - सोमनाथ सह

कालावधी - पुणे ते पुणे ६ दिवस (मुंबईहून सहभागी होता येईल)

- **गिरनार** - एक अवर्णनीय आणि अदभुत अनुभूती + दत्तपादुका आणि दत्तधुनी
- **गुरुशिखर** - अत्रि-अनसूया दत्तदर्शन + माऊंटअबू
- **गरुडेश्वर** - बोलणारी दत्तमूर्ती + प. प. टेम्ब्येस्वामी समाधी मंदिर
- **नारेश्वर** - दत्तबावनी रचनास्थळ + गोड कडूलिंब + प. पू. रंगावधूत महाराज समाधी मंदिर
- **सोमनाथ** - बारा ज्योतिर्लिंगांपैकी प्रमुख ज्योतिर्लिंग

✻ ए.सी. बसने प्रवास ✻ ए.सी. हॉटेलमध्ये मुक्काम ✻

✻ अनुभवी सहकारी ✻ डोली व्यवस्था ✻

सहभागी शुल्क - रु. १६,०००/- ज्येष्ठ नागरिकांना रु. १०००/- सवलत

माहिती, नोंदणीअर्ज व वेळापत्रक
7057617018 व्हॉटस्ॲप वर मागवा.

ऑनलाईन बुकिंग करा
www.kardaliwan.com/girnar

॥ कर्दळीवन ॥
सेवा संघ

॥ कर्दळीवन सेवा संघ पुणे ॥

कार्यालय : ६२२, जानकी रघुनाथ, पुलाची वाडी, झेड ब्रिज जवळ, डेक्कन, पुणे - ४११ ००४.
फोन : (०२०) २५५३०३७१ / २५५३४६०१ ईमेल : swami@kardaliwan.com
मोबाईल : 9371102439 / 9657709678

॥ श्री गुरूदेव दत्त ॥

गिरनार गुरुशिखर यात्रा

गरुडेश्वर, नारेश्वर, सोमनाथ सह

श्री गिरनार गुरुशिखर यात्रेमध्ये आपण सहभागी होणार आहात... आपले मनःपूर्वक अभिनंदन !

आता प्रत्यक्ष गिरनार गुरुशिखर येथे जाऊन तिथली अनुभूती घेणार आहात, ही आपल्यावर साक्षात दत्तप्रभूंची कृपाच आहे.

गिरनार :– महर्षी वेदव्यासांनी ज्याचा उल्लेख पुराणामध्ये 'रैवतगिरी' असा केला आहे असे गिरनार हे अतिशय महान दत्तक्षेत्र आहे. गुजरात राज्यामध्ये जुनागढ या शहराजवळ गिरनार हा पर्वत उभा आहे. गिरनार हे दत्तगुरूंचे सिद्धपीठ आहे आणि अवधूतपीठ आहे. तेथे दत्तप्रभूंनी १२००० हून अधिक वर्षे तपश्चर्या केली आहे. ते परम सिद्धीदाते आहेत, भक्तांच्या कामना ते पूर्ण करतात, भक्तांना आधार देतात, त्यांचे रक्षण करतात. श्रीदत्तात्रेयांचे गिरनार पर्वतावर अखंड वास्तव्य आहे. याबाबतची कथा अशी आहे की अत्रिमुनी आणि अनसूया या आपल्या मातापित्यांची आज्ञा घेऊन तपश्चर्या करण्यासाठी आणि तीर्थाटन करण्यासाठी दत्तगुरू बाहेर पडले. फिरत फिरत ते गिरनार पर्वतराजी मध्ये आले. तेव्हा तेथे पाण्याचा लवलेष नव्हता. ते पाहून श्रीदत्तात्रेयांनी आपला कमंडलू जोराने पर्वतावर फेकला. तो पर्वतावरील काळ्या पहाडावर आदळला. त्याने त्या पहाडांना भेगा पडल्या आणि त्यातून गंगा प्रकट झाली. श्रीदत्तात्रेयांचे दर्शन घेऊन प्रसन्न झालेल्या गंगामातेने आपण कायमस्वरूपी तेथे राहू असे सांगितले. त्यानंतर त्या परिसरामध्ये पाण्याचा संतत प्रवाह सुरू झाला. श्रीदत्तात्रेयांनी त्यानंतर तेथे धूनी पेटवली जी अजूनही प्रज्वलित आहे. गिरनार परिसरामध्ये असंख्य साधू संन्यासी वास करून राहत आहेत. तेथील घनदाट जंगलामध्ये शेकडो गुहा, पर्वत, दऱ्या आहेत. तिथे बसून ध्यानमग्न साधू, संन्यासी तपश्चर्या करीत असतात. अत्यंत पवित्र आणि दैवी असा हा परिसर आहे.गिरनार पर्वतावर मुख्य स्थानी पर्वतावर श्रीदत्त पादुका आहेत. त्यांना गुरुपादुका असेही म्हणतात. तेथे जाण्यासाठी ९,९९९ पायऱ्या चढून जावे लागते. गिरनारची यात्रा ही एक विलक्षण अनुभूती आहे. फार मोठे भाग्य असले तरच ही यात्रा करता येते. येथे शारीरिक क्षमतेबरोबरच मानसिक क्षमता, श्रद्धा, विश्वास या सर्वांचीच कसोटी लागते. प्रत्येक दत्तभक्ताने आयुष्यात एकदा तरी गिरनार यात्रा करावी.

गुरुशिखर :– अरवली ही फार मोठी पर्वतरांग राजस्थानमध्ये पसरलेली आहे. त्याच्या नैऋत्य भागामध्ये अबू या नावाचे प्रसिद्ध शिखर आहे. अबू पर्वतराजीमध्ये गुरुशिखर वसलेले आहे. श्रीदत्तात्रेय हे गिरनार आणि गुरुशिखर यावर तपश्चर्या आणि ध्यान करतात. तीर्थाटनाला निघताना श्रीदत्तात्रेयांनी आपल्या मातापित्यांना स्मरण करताच आपण लगेच दर्शन देऊ असे आश्वासन दिले होते. त्यानुसार या ठिकाणी ध्यान करीत असताना मातापित्यांनी त्यांची आठवण काढली. त्यावेळी श्रीदत्तात्रेय त्यांना गुरुशिखरावर घेऊन आले. गुरुशिखरावर एक फार मोठी घंटा असून तिचा नाद खूप दूर पर्यंत ऐकू येतो. याच ठिकाणी तुकोजी होळकरांना अक्कलकोटच्या श्रीस्वामी समर्थांनी दर्शन दिले अशी कथा आहे.

गरुडेश्वर :– प.प. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी श्रीक्षेत्र गरुडेश्वर या ठिकाणी समाधी घेतली आहे. नर्मदेच्या तीरावर हे ठिकाण असून या ठिकाणी गरुडाने श्रीविष्णूंच्या आज्ञेवरून गजासूर नावाच्या एका राक्षसाचा वध या ठिकाणी केला म्हणून या क्षेत्राचे नाव गरुडेश्वर असे पडले आहे. गरुडेश्वर या ठिकाणी श्रीदत्तात्रेयांचे सुंदर मंदिर आहे. या मंदिरात बोलणाऱ्या दत्तमूर्तीचे आपल्याला दर्शन होते.

नारेश्वर :– श्रीक्षेत्र नारेश्वर हे दत्त संप्रदायातील एक थोर अवतारी सत्पुरुष प.पू.श्री रंगावधूत महाराज यांनी तपश्चर्या केलेले ठिकाण आहे. तेथेच त्यांची समाधी आहे. गुजरात राज्यात त्यांनी श्रीदत्त संप्रदायाचा फार मोठ्या प्रमाणावर प्रचार आणि प्रसार केला आहे. नारेश्वर येथे एका कडूलिंबाच्या झाडाखाली प.पू. अवधूतांनी खडतर तपश्चर्या केली. तो कडुलिंब नम्र होऊन त्याच्या फांद्यांची वाढ वर (उर्ध्व) न होता खाली जमिनीकडे झाली. त्या फांद्या जमिनीस टेकल्या आहेत. इतकेच नव्हे तर प.पू. अवधूतांच्या तपश्चर्येमुळे त्या कडुलिंबाची पाने गोड झाली आहेत. त्यांनी रचलेली दत्तबावनी अतिशय प्रत्ययकारी आणि रोकडी प्रचिती देणारी आहे. गुरुचरित्राच्या ५२ श्लोकांवर आधारित या दत्तबावनीच्या पठनाने अनेकांचे आजार बरे झाले आहेत आणि विघ्ने दूर झाली आहेत. नारेश्वर येथे मोठे मंदिर असून बापजींची समाधी, अवधूत मंदिर, अवधूत गुंफा, प्रार्थना मंदिर, बोधीवृक्ष निंब, बापजींच्या पादुका आणि मातृमंदिर असा परिसर आहे.

सोमनाथ :– हे क्षेत्र बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक प्रमुख ज्योतिर्लिंग समुद्रकिनारी वसले आहे. येथून जवळच प्रभासतीर्थ आहे. त्याचेही आपण दर्शन घेतो.

गिरनार गुरुशिखर यात्रेचा नियोजित कार्यक्रम

पहिला दिवस :– आदल्या दिवशी रात्री ८.०० वाजता पुणे येथून प्रस्थान. सकाळी ७.०० वाजता बडोदा येथे हॉटेलमध्ये आगमन. सकाळी ९.३० वाजता गरुडेश्वरकडे प्रयाण. नारेश्वर आणि अनसूया दर्शन करून रात्री ८.०० वाजेपर्यंत बडोदा येथे आगमन–मुक्काम.

दुसरा दिवस :– सकाळी नाष्टा करून ८.०० वाजता माऊंटअबूकडे प्रयाण. रस्त्यामध्ये भोजन. संध्याकाळी ५.०० च्या सुमारास माऊंटअबू येथे आगमन आणि मुक्काम.

तिसरा दिवस :– सकाळी गुरुशिखर दर्शन – नाष्टा आणि राजकोटकडे प्रयाण. रस्त्यामध्ये भोजन. राजकोट येथे मुक्काम.

चौथा दिवस :– सकाळी सोमनाथकडे प्रयाण. दर्शन – प्रभास तीर्थ दर्शन – मुक्काम गिरनार.

पाचवा दिवस :– गिरनार दत्त पादुका दर्शन व परत मुक्काम गिरनार.

सहावा दिवस :– सकाळी बडोदाकडे प्रयाण – संध्याकाळी ८.०० नंतर बडोदा येथून पुण्याकडे प्रयाण – पहाटे पुणे येथे आगमन.

- **पुणे ते बडोदा आणि बडोदा ते पुणे हा प्रवास थर्ड एसी रेल्वेने किंवा एसी बसने करावयाचा आहे.** -

गिरनार गुरुशिखर यात्रेसाठी नोंदणी – नियम व अटी

(१) यात्रेसाठी मर्यादित जागा उपलब्ध असल्याने **''प्रथम आलेल्यांना प्रथम प्रवेश''** या तत्त्वावर प्रवेश दिला जाईल. तसेच ऑनलाईन नोंदणी करता येईल. रक्कम भरल्यावरच नोंदणी नक्की होईल. यात्रेच्या वेळापत्रकाप्रमाणे नोंदणी करून आपली जागा पक्की करावी. यात्रेसाठीची रक्कम आमच्या कार्यालयात रोखीने, चेकने किंवा आमच्या बँक ऑफ महाराष्ट्राच्या खात्यावर रोखीने, चेकने, ऑनलाईन ट्रान्सफर करून भरता येईल. यात्रा नोंदणी अर्ज आणि (संमती + हमीपत्र) + आयडी प्रुफ (आधारकार्ड) + १ फोटो आयडेंटि साईज कार्यालयात जमा करावा लागेल किंवा ईमेल द्वारा किंवा कुरियरने पाठवता येईल.

(२) स्वत:चे कपडे एक अंगावर–अधिक २ कपडे जोड, नेहमी लागणारी औषधे, इतर वस्तू आपल्या बरोबर घ्याव्यात. तसेच कमीत कमी कपडे आणि सामान घ्यावे. हाफ पँट किंवा बर्मुडा घेऊ नयेत. मौल्यवान वस्तू घेऊ नयेत. सामानासाठी पाठीवरची सॅक घ्यावी. पिशवी किंवा प्रवासी बॅग घेऊ नये. दंतमजन, टॉर्च, पाण्याची बाटली प्रत्येकाने स्वत: बरोबर घ्यावे.

(३) कर्दळीवन सेवा संघ म्हणजे ट्रॅव्हल एजन्सी किंवा फॅसिलिटी/सर्व्हिस प्रोव्हायडर नाही. ज्यांना गिरनार गुरुशिखर यात्रा करण्याची तीव्र इच्छा आहे, त्यांचेसाठी सेवा भावनेने आम्ही हे कार्य करीत आहोत. आम्ही यात्रेची फी म्हणून एवढी रक्कम भरली आहे, आता आम्हाला सर्व सोयी सुविधा वेळच्या वेळी मिळायलाच हव्यात आणि भरलेल्या पैशांची वसुली झालीच पाहिजे, अशा प्रकारचा दृष्टीकोन असणाऱ्या व्यक्तींनी कृपया या यात्रेत सहभागी होऊ नये, ही विनंती.

(४) आपल्याला यात्रेसंबंधी ज्या काही सूचना करायच्या असतील त्या यात्रा संपल्यावर लेखी स्वरूपात कराव्यात. तेथील पवित्र आणि मंगल परिसरात आयोजक आणि इतर कोणाबरोबर कोणत्याही प्रकारचे वाद घालून नये. यात्रेमध्ये कर्दळीवन सेवा संघाने तयार केलेले नियम आणि शिस्त कसोशीने पाळावे लागतील. त्याबाबत नंतर तक्रार चालणार नाही. त्या सर्वांची माहिती नोंदणी अगोदरच करून घ्यावी ही विनंती. ऐनवेळी परिस्थितीनुरूप यात्रेच्या कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार कर्दळीवन सेवा संघाने राखून ठेवलेला आहे, याची नोंद घ्यावी. कोणतीही माहिती, शंका, अडचण विनासंकोच, मोकळेपणाने आणि प्रांजळपणे आधीच विचारून आणि समजून घ्यावी. मनाचे समाधान झाल्यावरच यात्रेसाठी नावनोंदणी करावी ही विनंती.

(५) गिरनार गुरुशिखर यात्रा हा एक उत्कट, चैतन्यदायी आणि दैवी आध्यात्मिक अनुभव असल्याने ज्यांना पुरेसा वेळ काढता येईल, त्यांनीच सहभागी व्हावे, अशी विनम्र विनंती भाविकांना आहे. प्रत्येक यात्रेकरूने गिरनार गुरुशिखर यात्रेची भरभरून अनुभूती घ्यावी, अशा पद्धतीने या यात्रेचे नियोजन केले आहे. हा अनुभव आपले अष्ट सात्विक भाव जागृत करणारा, दैवी अनुभूती देणारा, आपले मनोबल उंचावणारा आणि कदाचित संपूर्ण आयुष्य बदलून टाकणारा असेल असे वाटते. त्यासाठी आपणाला सर्वतोपरी सहाय्य

करावे असा आमचा या नियोजनाचा हेतू आहे. ही यात्रा म्हणजे कोणतीही पिकनिक नाही किंवा ट्रेकिंग नाही. स्वत:ला अंतर्बाह्य प्रगल्भ करणारा एक प्रवास म्हणूनच या यात्रेकडे प्रत्येकाने पाहिले पाहिजे. या यात्रेने आपली प्रापंचिक, ऐहिक संकटे दूर होण्यास तर मदत होईलच, त्याचबरोबर आपली आध्यात्मिक उन्नती होईल. आपली साधना बळकट होईल, जीवनात एक अपूर्व आनंद निर्माण होईल. श्री दत्तप्रभूंची आपल्यावर निश्चितच कृपा होईल, याची अनुभूती या यात्रेदरम्यान प्रत्येकाने घ्यावी.

(६) सर्व प्रकारच्या तक्रारी, दावे यासाठी न्यायालयीन प्रक्रियेची सीमा, पुणे शहर न्यायालयीन क्षेत्र हे राहील.

गिरनार गुरुशिखर यात्रा - रचना आणि आयोजन

१. ही यात्रा पुणे ते पुणे २ **x** २ एसी बसने होणार आहे. यात्रेमध्ये शाकाहारी चहा-नाष्टा-भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. मुक्कामाची व्यवस्था एसी हॉटेलमध्ये दोन किंवा तीन व्यक्ती एका रुममध्ये अशी केलेली आहे. गुरुशिखर या ठिकाणची व्यवस्था नॉन एसी निवास व्यवस्था एका रूममध्ये ४ व्यक्ती अशी करण्यात आली आहे. चहा-नाष्टा-भोजनाची व्यवस्था मार्गातील आणि मुक्कामाच्या परिसरातील हॉटेलमध्ये केलेली आहे. जेवणाची व्यवस्था शाकाहारी थाळी सिस्टीमप्रमाणे आहे.

२. गिरनार येथे ९,९९९ पायऱ्या चढून जाताना रात्री २.०० वाजण्याच्या सुमारास गिरनार चढायला सुरुवात करायची आहे. ज्यांना डोली करायची आहे त्यांना त्याचे स्वतंत्र चार्जेस तेथेच द्यावे लागतील. ते चार्जेस व्यक्तीनुसार आणि वजनानुसार बदलत असतात. अंदाजे ६० किलो वजनाच्या व्यक्तीला ८ ते १० हजार रुपयापर्यंत खर्च येतो. साधारणपणे पहाटे ६.०० वाजेपर्यंत आपण दत्त पादुकांपर्यंत पोहोचतो. तेथे दर्शन घेऊन कमंडलू तीर्थाजवळ प्रसाद घेऊन दुपारी ४.०० वाजेपर्यंत पुन्हा गिरनार येथे पोहोचतो.

गिरनार गुरुशिखर यात्रेसाठी व्यवस्था सेवा-सहयोग राशी खालीलप्रमाणे

• पुणे ते पुणे - रु. १६०००/- • **ज्येष्ठ नागरिकांना प्रती व्यक्ती रु. १०००/- सवलत**

बँक खात्याची माहिती

खात्याचे नाव :- कर्दळीवन परिक्रमा संघ

चालू खाते क्र. 60138462361

बँकेचे नाव :- बँक ऑफ महाराष्ट्र, डेक्कन जिमखाना पुणे शाखा,

IFS Code : MAHB0000003

कर्दळीवन सेवा संघाच्या

व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये

सामील व्हा...

धार्मिक, अध्यात्मिक आणि

सामाजिक उपक्रमांचे अपडेट्स मिळवत रहा.

7057617018

हा क्रमांक तुमच्या मोबाईलमध्ये कर्दळीवन सेवा संघ

या नावाने सेव्ह करा आणि Join KSS असा मेसेज पाठवा.